क्र: विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.६०/अपिले कार्यभार/ब- ४२० दिनांक: ०३/०५/२०१२.

पुनर्रचना कक्ष,
विशेष विक्रीकर आयुक्तांचे
कार्यालय, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई ४०००१०.

# कार्यालयीन आदेश

**विषयः- अपिल कार्यभार - विक्रीकर उपआयुक्त (अपिले) व विक्रीकर सहआयुक्त (अपिले)**

संदर्भ:- (१) शासन निर्णय क्र. विकआ १२०५/प्र.क्र. ११९/वि.प्र. ४, मुंबई दि. ०५.०१.२००७.
(२) शासन निर्णय क्र. विकवि १२११/प्र.क्र.२९१/वि.प्र.४, मुंबई दि. १८.११.२०११.
(३) कार्यालयीन आदेश क्र. अविआ/म.रा./कार्या.निहाय पदे/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.५८/ ब-३७८ मुंबई, दि. ०१.१२.२०११.
(४) कार्यालयीन आदेश क्र. अपिले/एकत्रीकरण/पुनर्रचना कक्ष/प्र.क्र.६०/ ब-३७९ दि. ०१.१२.२०११.
(५) सुधारित आदेश क्र. विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/अपिले कार्यभार/ प्र.क्र.६०/ ब-४१७ मुंबई, दि. ०१.०३.२०१२.
(६) कार्यालयीन आदेश क्र. विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/मुंविका-अपिले कार्यभार/ प्र.क्र.६०/ब-४२१ मुंबई, दि. १५.०३.२०१२.

विक्रीकर विभागाच्या पुनर्रचनेच्या फेरआढाव्यानंतर, संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेली पदे विचारात घेऊन संदर्भ क्र. ३ च्या कार्यालयीन आदेशान्वये पुनर्रचनेनंतर कार्यालयनिहाय पदांचे तक्ते निर्गमित करण्यात आले होते. त्यानुषंगाने संदर्भ क्र. ४ च्या कार्यालयीन आदेशान्वये अपिल प्रकरणांच्या गुणवत्तापूर्ण निपटाऱ्यासाठी विभागामध्ये फक्त विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांची पदे ठेवण्यात आली होती. तसेच विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्या १९ कार्यभारांचे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्या १७ कार्यभारांमध्ये एकत्रीकरण करण्यात येऊन विभागामध्ये एकूण १७ विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार कायम ठेवण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते.

संदर्भ क्र. ५ च्या सुधारीत आदेशान्वये नोंदणी शाखेतील [विक्रीकर सहआयुक्त (अपिले - १) मुंबई यांचेकडील नोंदणी शाखेतील अपिले वगळता] अपिले विक्रीकर उपायुक्त (नोंदणी) १, मुंबई यांचे ऐवजी विक्रीकर सहआयुक्त (वसुली), मुंबई यांचेकडे राहतील असे निर्देश देण्यात आले होते. ते या कार्यालयीन आदेशान्वये रद्द करण्यात येत आहेत.

संदर्भ क्र. ६ च्या कार्यालयीन आदेशान्वये सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारित केलेल्या, विक्रीकर विभाग राबवित असलेल्या सर्व कर कायद्यांखालील वैधानिक आदेशांविरुध्दची दि. ०१.०१.२०१२ नंतर दाखल करण्यात येणारी अपिले, पुढील आदेश निर्गमित करण्यात येईपर्यंत विक्रीकर उपआयुक्त यांचेकडे राहतील. तर विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेल्या आदेशांविरुध्द विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे अपिल दाखल करण्यात यावीत याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. सदर संदर्भ क्र. ६ वरील आदेश या कार्यालयीन आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे.

प्रशासकीय सोयीसाठी आणि कायदा व नियम यातील तरतुदींच्या अधीन राहून खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

**(१) विक्रीकर सहआयुक्त यांच्या कामाची वाटणी व कार्यक्षेत्र:-**

विक्रीकर उपआयुक्तांनी पारीत केलेल्या वैधानिक आदेशाविरुध्द विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे अपिल दाखल करता येईल. खालील तक्त्यातील रकाना क्र. २ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विक्रीकर सहआयुक्त यांना रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यशाखानिहाय/विभागनिहाय अपिल कार्यभार देण्यात आले असून रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांचे कार्यक्षेत्र राहील.

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१) सर्वेक्षण शाखा, नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, सीमा तपासणी नाके शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१) सर्वेक्षण शाखा, नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, सीमा तपासणी नाके शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| २. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) २, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ३. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ३, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), परतावा लेखा परीक्षण शाखा (१) व (२), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), परतावा लेखा परीक्षण शाखा (१) व (२), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ४. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ४, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), अन्वेषण शाखा (अ) व (ब), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), अन्वेषण शाखा (अ) व (ब), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ५. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), बेलापूर | (अ) व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले<br>(ब) पुनर्रचनेपुर्वीच्या घाटकोपर विभागातील मुंबई विक्रीकर कायद्यांतर्गत जुनी व नवीन अपिले | (अ) रायगड विभाग<br>(ब) मुंबई विक्रीकर कायद्याच्या प्रलंबित अपिलांसाठी पुनर्रचनेपुर्वीचा घाटकोपर विभाग |
| ६. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), ठाणे | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | ठाणे शहर व ठाणे ग्रामीण विभाग (पालघर) |
| ७. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले |
| ८. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले) २, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले |
| ९. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), नाशिक | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | नाशिक व धुळे विभाग |

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १०. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), कोल्हापूर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | कोल्हापूर व सोलापूर विभाग |
| ११. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), अमरावती | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | अमरावती व नांदेड विभाग |
| १२. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), नागपूर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | नागपूर क्षेत्र |
| १३. | विक्रीकर सहआयुक्त (अपिले), औरंगाबाद | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | औरंगाबाद विभाग |

(२) विक्रीकर उपआयुक्त यांच्या कामाची वाटणी व कार्यक्षेत्र:-

सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांनी पारीत केलेल्या वैधानिक आदेशाविरुध्दची अपिले खालील विक्रीकर उपआयुक्तयांचेकडे राहतील. खालील तक्त्यातील रकाना क्र. २ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विक्रीकर उपआयुक्त यांना रकाना क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कार्यशाखानिहाय/विभागनिहाय अपिल कार्यभार देण्यात आले असून, रकाना क्र. ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे त्यांचे कार्यक्षेत्र राहील.

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (१), मोठे करदाते कक्ष (१), नोंदणी शाखा, मध्यवर्ती भांडार कक्ष, समुपदेशन कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), सर्वेक्षण शाखा, तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (२), मोठे करदाते कक्ष (२), सर्वेक्षण शाखा, तपासणी ज्ञाप कक्ष, नमुना- ७०४ कक्ष, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ३. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ३, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (३), मोठे करदाते कक्ष (३), विवरण शाखा, वसुली शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ४. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ४, मुंबई | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील व्यवसाय लेखा परीक्षण शाखा (४), मोठे करदाते कक्ष (४), व्यवसायकर शाखा व इतर कायदे, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ५. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ५, मुंबई | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१), परतावा लेखा परीक्षण शाखा (१), अन्वेषण शाखा (अ), सीमा तपासणी नाके शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (१), परतावा लेखा परीक्षण शाखा (१), अन्वेषण शाखा (अ), सीमा तपासणी नाके शाखा, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ६. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) ६, मुंबई | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), परतावा लेखा परीक्षण शाखा (२), अन्वेषण शाखा (ब), नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) | मुंबईतील मुद्देनिहाय लेखा परीक्षण शाखा (२), परतावा लेखा परीक्षण शाखा (२), अन्वेषण शाखा (ब), नवीन अपिले मुंबई विक्रीकर कायदा विभाग, जुनी अपिले (मुं.वि.का. व इतर कायद्याखालील अपिले पुर्वीप्रमाणे) |
| ७. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, बेलापूर | (अ) व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले<br>(ब) पुनर्रचनेपुर्वीच्या घाटकोपर विभागातील मुंबई विक्रीकर कायद्यांतर्गत जुनी व नवीन अपिले | (अ) रायगड विभाग<br>(ब) मुंबई विक्रीकर कायद्याच्या प्रलंबित अपिलांसाठी पुनर्रचनेपुर्वीचा घाटकोपर विभाग |
| ८. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, ठाणे शहर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | ठाणे विभाग |
| ९. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, ठाणे ग्रामीण (पालघर) | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | ठाणे ग्रामीण (पालघर) |
| १०. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जुनी व व्हॅटमधील अपिले |
| ११. | विक्रीकर उपआयुक्त (अपिले) २, पुणे | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्र वगळून पुणे विभागातील जुनी व व्हॅटमधील अपिले |
| १२. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, कोल्हापूर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | कोल्हापूर विभाग |

| अ. क्र. | दि. ०१.०५.२०१२ पासून कायम राहणारे विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार | कामाची वाटणी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १३. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, सोलापूर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | सोलापूर विभाग |
| १४. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, नाशिक | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | नाशिक विभाग |
| १५. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, धुळे | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | धुळे विभाग |
| १६. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, औरंगाबाद | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | औरंगाबाद विभाग |
| १७. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, नांदेड | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | नांदेड विभाग |
| १८. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, नागपूर | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | नागपूर विभाग |
| १९. | विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, अमरावती | व्हॅट व इतर कायद्यांतर्गतील जुनी व नवीन अपिले | अमरावती विभाग |

मुंबई व पुणे वगळता इतर विभागीय कायार्लयातील विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यशाखांच्या पर्यवेक्षणाबरोबरच अपिल कार्यशाखेचे काम पाहावे.

संदर्भ क्र. ४ च्या कार्यालयीन आदेशान्वये विक्रीकर उपआयुक्त (अपिले) व विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांच्या कार्यभारांचे एकत्रीकरण करुन एकूण १७ विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचे कार्यभार ठेवण्यात आले होते. या कार्यालयीन आदेशान्वये निर्देशित करण्यांत आलेल्या विभागनिहाय विक्रीकर उपआयुक्त (अपिले)/विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १ यांना, उपरोक्त १७ विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांनी, संदर्भ क्र. ४ मधील आदेशान्वये एकत्रीकरण करण्यात आलेल्या विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्या कार्यभारातील दि. ३१.१२.२०११ पूर्वीची प्रकरणे उपरोक्त तक्त्यातील कामाची वाटणी (रकाना क्र. ३) व कार्यक्षेत्र (रकाना क्र. ४) याप्रमाणे संबंधितांकडे सुपूर्द करावीत. तसेच विक्रीकर सहआयुक्त (अपिले) ६, मुंबई यांनी त्यांच्याकडे दाखल झालेली विक्रीकर उपआयुक्तांच्या आदेशाविरुध्दची अपिले

विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १ ते ४, मुंबई यांचेकडे त्यांच्याकडील कामाच्या वाटणीप्रमाणे सुपूर्द करावीत.

दि. ०१.०१.२०१२ नंतर विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांनी दाखल करुन घेतलेली सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांच्या आदेशाविरुध्दची अपिले, उपरोक्त तक्त्यांतील विक्रीकर उपआयुक्त (अपिले)/विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १ यांच्याकडे कामाची वाटणी व कार्यक्षेत्र याप्रमाणे सुपूर्द करावीत.

संदर्भ क्र. ६ च्या कार्यालयीन आदेशान्वये, दि. ०१.०१.२०१२ नंतर अपिले दाखल करुन घेणेबाबत निर्देशित करण्यात आलेल्या विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांनी त्यांच्याकडे दाखल झालेली अपिले प्रकरणे, या कार्यालयीन आदेशामध्ये निर्देशित करण्यात आलेल्या विक्रीकर उपआयुक्त (अपिले)/विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १ यांचेकडे उपरोक्त तक्त्यातील कामाची वाटणी (रकाना क्र. ३) व कार्यक्षेत्र (रकाना क्र. ४) याप्रमाणे सुपूर्द करावीत.

विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, ठाणे यांनी नवीन मुंबई महानगर क्षेत्रातील व्यापाऱ्यांची अपिले, विक्रीकर उपआयुक्त (व्हॅट) १, बेलापूर यांना हस्तांतरित करावीत (याअगोदर हस्तांतरित झाली नसल्यास) मुंबई कार्यालयातील नोंदणी शाखेतील विक्रीकर अधिकारी यांच्या आदेशाविरुध्दची अपिले [विक्रीकर उपआयुक्त (अपिले) १, मुंबई यांचेकडील नोंदणी शाखेतील अपिले वगळता] विक्रीकर उपआयुक्त (नोंदणी) १, मुंबई यांचेकडे दाखल करण्यात यावीत. विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १, मुंबई व विक्रीकर सहआयुक्त (वसुली) मुंबई यांनी, त्यांचेकडील नोंदणी शाखेतील प्रलंबित अपिले विक्रीकर उपआयुक्त (नोंदणी) १ मुंबई यांचेकडे सुपूर्द करावीत.

तसेच विक्रीकर अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त यांनी पारित केलेल्या वैधानिक आदेशांविरुध्द विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांचेकडे अपिले दाखल करण्यात यावीत व विक्रीकर उपआयुक्त यांनी पारित केलेल्या वैधानिक आदेशांविरुध्द विक्रीकर सहआयुक्त (अपिले) यांचेकडे अपिले दाखल करावीत. ज्यांचे आदेशावर विक्रीकर सहआयुक्त (अपिले) व विक्रीकर उपआयुक्त (अपिले) यांच्याकडे अपिल दाखल केले जाते त्या सर्व अधिकाऱ्यांनीही वरील बदलांची नोंद घेऊन त्याप्रमाणे त्यांचेकडून पारित होणाऱ्या आदेशात नेमक्या अपिल प्राधिकाऱ्याचा उल्लेख करावा.

(संजय भाटिया)
विक्रीकर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u> :-

१. सर्व अपर विक्रीकर आयुक्त.
२. मुख्य दक्षता अधिकारी.

३. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
४. विक्रीकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
५. विक्रीकर आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. विशेष विक्रीकर आयुक्त कार्यालयातील सर्व कार्यासने.
७. विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय-१) यांना (वैधानिक आदेश/अधिसूचना संबंधाने)
८. सर्व विक्रीकर उपआयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी.